# निशाणी १२ खालील आदेश

(माधवी संतोष गायकवाड वि. संतोष सुरेश गायकवाड)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दोन्ही मुलींचा ताबा मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार, अर्जदार व जाबदार क्र. १ यांच्या वैवाहिक संबंधातून कु. नव्या व कु. प्रियांशी या दोन मुली आहेत. जाबदार यांनी अर्जदार यांना प्रचंड मानसिक व शारिरीक त्रास दिला, त्यांना जिवे मारण्याच्या धमक्या देवून घराबाहेर हाकलून दिले. जाबदार यांच्यापासून अर्जदाराच्या जिवाला धोका झालेला आहे. जाबदार यांनी अर्जदार व त्यांच्या दोन्ही मुलींना घराबाहेर काढले आहे. दिनांक २२.०९.२०२४ पासून अर्जदार या दोन मुलींसह भाडयाच्या घरात राहतात. अर्जदार यांनी त्यांच्यावर होत असलेल्या हिंसाचाराची तक्रार वारंवार केली परंतु पोलिसांनी त्याची दखल घेतली नाही. जाबदार यांनी पोटगी द्यायला लागू नये म्हणून एके दिवशी परस्पर मुलींना जबरदस्तीने घेवून गेले आहेत. जाबदार हे मुलींना मातृप्रेमापासून वंचित ठेवत असून त्याचा मुलींच्या आयुष्यावर, संस्कारावर परिणाम होईल याचा त्यांनी विचार केला नाही. अर्जदार या कधी मुलींना भेटायला गेल्या तर जाबदार त्यांना भेटू देत नाहीत व अर्जदार आणि मुलींसोबत क्रुरपणे वागतात. जाबदार यांना दारुचे व्यसन असल्यामुळे ते दारु पिउन अर्जदाराला मारहाण करतात. मुलींची काळजी घेण्यास जाबदार असमर्थ आहेत. त्यामुळे मुलींना अर्जदाराकडे सुपूर्द करण्याचा आदेश करावा अशी विनंती केली.

२. जाबदार यांना प्रस्तुत अर्जाची समन्स बजावणी झालेली आहे त्याचा रिपोर्ट अर्जदारातर्फे दाखल केला आहे. परंतु जाबदार याकामी हजर राहिले नाहीत. प्रस्तुत अर्जावर वकिलांनी युक्तिवाद केला की, अर्जदाराच्या मुली वयाने लहान आहेत, त्यांना आईच्या सहवासाची आवश्यकता आहे. जाबदार हे अर्जदार यांना मुलींना भेटू देत नाहीत. त्यामुळे मुलींना भेटवण्याचा आदेश व्हावा व त्याप्रमाणे पोलिसांना निर्देश द्यावेत अशी विनंती केली.

३. अर्जदाराच्या कथनानुसार, त्या दिनांक २२.०९.२०२४ रोजीपासून जाबदार पासून स्वतंत्र राहत आहेत. जाबदार यांनी अर्जदार यांना मानसिक व शारिरीक त्रास दिलेला आहे. दोन्ही मुलींना जाबदार कोणत्या तारखेला घेवून गेले याबाबत अर्जदाराने नमूद केलेले

नाही. परंतु जाबदार यांनी हजर होवून स्वतःचे म्हणणे मांडलेले नाही. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्यामुळे अर्जातील कथनाबाबत निर्माण करण्याचे कारण दिसून येत नाही. दोन्ही मुलीं या अल्पवयीन दिसून येतात, त्यांना आई-वडिलांच्या सहवासाची व प्रेमाची गरज आहे.

४. अर्जदार व जाबदार यांच्या दरम्यान कौटुंबिक न्यायालयात अर्ज प्रलंबीत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत दोन्ही मुलींच्या हितासाठी त्यांना अर्जदार यांना भेटवणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी मुलींचा ताबा जाबदार यांच्याकडे ठेवल्यास त्यांना काही अपाय होवू शकतो याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे मुलींच्या ताब्याबाबत निर्णय देणे योग्य नाही परंतु सद्य परिस्थीतीमध्ये अर्जदार यांना मुलींच्या भेटीसाठी आदेश करणे योग्य व न्याय आहे. सबब खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज अशंतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार यांना तुर्तातुर्त आदेश देण्यात येतो की, त्यांनी पुढील आदेशापर्यंत अर्जदार यांना आठवडयातून एक दिवस मुलींच्या शाळेच्या सुट्टीच्या दिवशी भेटण्यास द्यावे.

३. अर्जदार व जाबदार यांनी मुलींच्या भेटीच्या दिवशी मुलींच्या हिताची, सुरक्षेची जबाबदारी घ्यावी.

४. नजिकच्या पोलीस स्टेशन मधील पोलिसांनी आवश्यक ते सहाय सुरक्षेच्या दृष्टीने द्यावे.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2025.07.30 12:30:45 +0530

दिनांक २९.०७.२०२५

(एस.क. दशमुख)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सासवड